MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# जाहिर निवेदन

## महावितरण कार्यालय, विभाग पुसद

महावितरण कार्यालय, सं.व.सु. विभाग पुसद येथे वर्ष २०२४-२५ करीता एक (१) वर्ष कालावधी करीता आय.टी.आय. विजतंत्री (इलेक्ट्रिशियन) १३, तारतंत्री (वायरमन) ३६ व कोपा - ०६ अशी एकुण - ५५ उमेदवारांची शिकाऊ प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे. त्याकरीता केवळ यवतमाळ जिल्ह्यातील आय.टी.आय. उत्तिर्ण झालेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. त्याकरीता https://apprenticeshipindia.org या संकेत स्थळावर दि.१२.०२.२०२४ ते दि.२१.०२.२०२४ चे रात्री १२.०० वा. पर्यंत (आस्थापना क्र. E01782700128) वर सर्व शैक्षणीक प्रमाणपत्र, रहीवाशी दाखला व इतर कागदपत्रासह सुव्यवस्थीत ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. दि.२१.०२.२०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारामधून आय.टी.आय.विजतंत्री (इलेक्ट्रिशियन), तारतंत्री (वायरमन) व कोपा या व्यवसायाच्या एकत्रीत टक्केवारी नुसार शिकाऊ उमेदवाराची व्यवसाय निहाय निवड यादी व प्रतिक्षा यादी दि.२८.०२.२०२४ रोजी कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेशासाठी कार्यालय कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., सं.व.सु. विभागीय कार्यालय, विद्युत भवन, कारला रोड श्रीरामपुर ता.पुसद, जि. यवतमाळ येथे मुळ शैक्षणिक प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, आस्थापना नोंदणी, रहीवाशी दाखला प्रत व इतर आवश्यक त्या मुळ प्रमाणपत्रासह तपासणी करीता हजर राहण्याबाबत कळविण्यात येईल. कोणत्याही पुर्व सुचने शिवाय शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेत बदल करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पुसद यांना राहील.

अधिक माहितीसाठी apprenticepsd24@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या., विभाग पुसद